• **अध्ययन अनुभव** :-- शिक्षण म्हणजे योग्य दिशेने झालेला बदल होय. व्यक्तीच्या वर्तनात झालेले सुयोग्य परिवर्तन म्हणजेच शिक्षण आहे. हा बदल घडवून आणणाऱ्या अनुभूतीना शैक्षणिक अनुभव असे म्हटले जाते. इंग्रजी भाषेत Experience is the best teacher असे एक वचन आहे. अनुभव हा सर्वश्रेष्ठ गुरु आहे.

• * **अनुभव म्हणजे काय?** एखादा प्रसंग विद्यार्थ्यावर आघात करतो, त्याला विद्यार्थी प्रतिसाद देतो. व्यक्ती आणि परिस्थिती यांच्यात होणारी क्रिया प्रतिक्रिया म्हणजे शैक्षणिक अनुभूती होय.

• * **व्याख्या** -व्यक्ती आणि परिस्थिती यांच्यामध्ये होणारी क्रिया प्रतिक्रिया म्हणजे शैक्षणिक अनुभूती होय. विद्यार्थ्यांच्या मनावर एखादा प्रसंग आघात करतो, त्याला विद्यार्थी प्रतिसाद देतो म्हणजे तिथे क्रिया प्रतिक्रिया घडते. शैक्षणिक अनुभूतीचे वर्गीकरण दोन गटात केले जाते- 1) प्रत्यक्ष अनुभव2) अप्रत्यक्ष अनुभव

1) **प्रत्यक्ष** अनुभव:ज्ञानेंद्रियांच्या माध्यमाद्वारे वस्तू, व्यक्ती व घटना यांच्याबद्दल मिळणारे ज्ञान व त्यासंबंधी अनुभव घेणाऱ्याची स्थिती अन्य कोणत्याही साधनांशिवाय असेल तर तो प्रत्यक्ष अनुभव होय.

2) **अप्रत्यक्ष अनुभव**:- प्रत्यक्ष अनुभव घेणे शक्य नसेल तेव्हा अन्य साधनांचा उपयोग करून आपण ज्ञान मिळवतो तेव्हा तो अप्रत्यक्ष अनुभव होतो.

* **श्रवण**-मातृभाषेच्या अनुभवाची सुरुवात श्रवणपासून होते. स्वतःच्या मनातील विचार इतरांसमोर व्यवस्थितपणे मांडणे जितके महत्त्वाचे आहे; तितक्याच दुसऱ्यांचे विचार ऐकून घेणे हे देखील अत्यंत महत्त्वाचे आहे.एखाद्याचे विचार शांतपणे ऐकून घेणे ही गोष्ट वाटते तेवढी सोपी नाही.शांतपणे ऐकत असताना त्याचे आकलन व्हावे लागते.

- **प्रकट वाचन**-वाचन म्हणजे विविध क्षेत्रातील ज्ञानप्राप्तीचे महत्त्वाचे साधन होय. वाचनामुळे माणसाला बहुश्रुतता प्राप्त होते. माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधला जातो.
- ➢ **मूक वाचन किंवा मनोगत वाचन**:-प्रकट वाचन या प्रमाणेच वाचनाचा आणखी एक महत्वाचा प्रकार म्हणजे मुक्त वाचन किंवा मनोगत वाचन होय.प्रकट वाचन यापेक्षा आपण मनोगत वाचण्यात अधिक प्रमाणात करीत असतो.त्याची आवश्यकताही अधिक असते.
- ➢ **पूरक वाचन व लेखन**:- भाषेचे पाठ्यपुस्तक हे भाषा शिकविण्याचे साधन आहे.या पाठ्यपुस्तकात पूरक वाचनासाठी विविध कवितांचा, काव्यसंग्रह, कथा-कादंबऱ्या, निबंध, चरित्र,आत्मचरित्र व अन्य साहित्य.

- **भाषण**-भाषेच्या अध्यापनात भाषण हे प्रगटीकरण आत्मक उद्दिष्ट आहे. आपल्या मनातील विचार व भावना दुसऱ्याला सांगण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला व्यवस्थितरीत्या बोलता येणे अगत्याचे आहे. योग्य शब्दात आपले मत किंवा आपल्या म्हणले प्रभावी व परिणामकारकपणे दुसऱ्या समोर मांडणे ही कला आहे व ही कला अवगत असणे ही संपन्न व्यक्तिमत्त्वासाठी आवश्यक बाब आहे.
  * **संभाषण**- विद्यार्थ्यांना आत्माविष्का राची संधी निर्माण करून देण्याचे काम शिक्षकांचे आहे. अर्थात त्यासाठी प्रथम विद्यार्थी व शिक्षक यांच्यात सुसंवाद असणे अगत्याचे आहे. एखादे गद्य बापदेव याचे अध्यापन करताना प्रसंगानुरूप विद्यार्थ्यांना बोलण्याची संधी प्राप्त करून द्यावी.
- * **अनौपचारीक संभाषण**:- जे संभाषण मनमोकळेपणाने, आत्मीयतेने व जिव्हाळ्याने केले जाते त्याला अनौपचारीक संभाषण म्हणतात. अ) घरगुती संवाद ब) गप्पा गोष्टी क) अंताक्षरी किंवा भेंड्या स्पर्धा ड) संदेश वहन

- * औपचारिक संवाद :-जे संभाषण सहेतुक, सुव्यवस्थित व नियमबद्ध कसे केले जाते ते अनौपचारीक संभाषण होय.
- अ) वर्णन - विविध प्रकारचे वर्णन म्हणजे अनौपचारीक संभाषण होय
- ब) चर्चा- प्रत्येक व्यक्तीला स्वतःचे विचार व्यक्त करण्याची संधी प्राप्त होते. चर्चा ही लहान मोठ्या गटात करता येते.
- * कथन:-स्वतःच्या भावना विचार दुसऱ्या व्यक्तीला सांगणे म्हणजेच कथन होय. रसाळ भाषा हा कथनाचा मुख्य गुण होय.
- * निवेदन:-एखाद्या पाठ करणाऱ्या विद्यार्थ्यांनी आकलन करण्यासाठी शिक्षकाला निवेदन करावे लागते. पाठातील कल्पना, कठीण विचार, शालेय विद्यार्थ्यांना स्पष्ट करून सांगण्यासाठी शिक्षकाला प्रभावी निवेदन करावे लागते.

- * स्पष्टीकरण:-शिक्षकाला पाठ शिकविताना विषय प्रतिपादन करताना त्यातील मुद्द्यांचे स्पष्टीकरण करावे लागते.
- * नाट्यीकरण:- पाठ्यपुस्तकांच्या मदतीने आपण मराठी भाषा विद्यार्थ्यांना शिकवतो. मराठी भाषेच्या पाठ्यपुस्तकात साहित्यातील निरनिराळे प्रकार असतात. निबंध, कथा, नाट्य उतारा, नाट्यछटा कविता इत्यादी साहित्यातील उतारे विद्यार्थ्यांपुढे सादर करताना नाट्यीकरण आवश्यक असते.
- * पाठांतर:-मुद्रणकलेचा शोध लागण्यापूर्वी पाठांतर याच माध्यमातून ज्ञान नवीन पिढीकडे पोहोचविले जात होते.

- * **लेखन**:- मातृभाषेच्या अध्यापन आतून विद्यार्थ्यांना द्यायच्या विविध अनुभूतींचा आपण अभ्यास करीत आहोत. यात श्रवण, भाषण, वाचन, नाट्यीकरण, पाठांतर इत्यादी अनुभूतींचा आपण विचार केला. या विविध अनुभूतीत लेखन ही आणखी एक श्रेष्ठ व वरच्या दर्जाची अनुभूती आहे.
- * **रसग्रहण**:- मराठी विषयाच्या अध्यापन आतून आपण विद्यार्थ्यांना वैचारिक वांग्मय आणि भावात्मक साहित्य यांचे प्रसिद्धी देण्याचा प्रयत्न करीत असतो.

- * कोशांचा व संदर्भ ग्रंथांचा वापर:-
  शालेय ग्रंथालयात विविध कोश उपलब्ध असले पाहिजेत. संदर्भ ग्रंथ व अवांतर वाचनासाठी पूरक पुस्तके यांनी ग्रंथालय समृद्ध असावयास हवे. *
- शैक्षणिक साधनांचा वापर:-दैनंदिन अध्यापनात उद्दिष्टे व ध्येय साध्य करण्यासाठी आपण विद्यार्थ्यांना अनुभव देतो. विद्यार्थ्यांना हे अध्ययन अनुभव डोळे व कान या ज्ञानेंद्रियं मार्फत दिले जातात.